7. As on date of this DPS, there is no revision in the Offer Price or Offer Size. In case of any revision in the Offer Price or Offer Size, the Acquirers will comply with all the provisions of the Regulation 18(5) of the Takeover Regulations which are required to be fulfilled for the said revision in the Offer Price or Offer Size.
8. If there is any revision in the Offer Price on account of future purchases / competing offers, it will be done only upto one working day prior to the date of commencement of the TP in accordance with Regulation 18(4) of the Takeover Regulations and would be notified to the shareholders by way of another public announcement in the same newspapers where the DPS has appeared.

V. FINANCIAL ARRANGEMENTS:

1. Assuming full acceptance under the offer, the maximum consideration payable by the Acquirers under the offer would be Rs. 7,56,60,000/- (Rupees Seven Crores Fifty-Six Lakhs Sixty Thousand Only) ("maximum consideration") i.e., consideration payable for acquisition of 37,83,000 equity shares of the target Company at offer price of Rs. 20.00/- per Equity Share.
2. The Acquirers have adequate resources to meet the financial requirements of the Open Offer. No funds are being borrowed from any bank or financial institution for the purpose of this Open Offer by the Acquirers.
3. The Acquirers, the Manager to the Offer and ICICI Bank Limited, a Banking Corporation incorporated under the laws of India, have entered into an escrow agreement for the purpose of the Offer (the "Escrow Agreement") in accordance with regulation 17 of the SEBI (SAST) Regulations, 2011. Pursuant to the Escrow Agreement, the Acquirers on September 25, 2026 have deposited cash of an amount of Rs. 190.00 Lacs in an escrow account opened with ICICI Bank Limited, which is in excess to 25% of the Offer Consideration.
4. The Acquirers has duly empowered Navigant Corporate Advisors Limited, the Manager to the Open Offer, to realize the value of the Escrow Account in terms of the SEBI (SAST) Regulations, 2011.
5. CA Alok Chaturvedi (Membership No. 127600), Partner of M/s. GMCS & Co., Chartered Accountants (Firm Registration No. 141236W) having their office located at SB-18, 2nd Floor, High Street Cum Highland Corporate Centre, Majiwade Thane (West), Thane - 400 607; Tel: +91-9819383311; Email: alokchaturvedi45@gmail.com; vide certificates dated August 12, 2026 has certified that Net Worth of Acquirer-1 is Rs 2828.35 Lacs as on June 12, 2026, (UDIN: 26127600SEUYXA2233) and Net worth of Acquirer-2 is Rs 1792.93 Lacs as on June 12, 2026, (UDIN: 26127600MKCEVU7911) and Acquirers have sufficient resources to make the fund requirement for fulfilling all the obligations under the Offer.
6. Based on the above and in the light of the escrow arrangement, the Manager to the Open Offer is satisfied that the firm arrangements have been put in place by the Acquirers to fulfill their obligations through verifiable means in relation to the Offer in accordance with the SEBI (SAST) Regulations, 2011.

VI. STATUTORY AND OTHER APPROVALS REQUIRED FOR THE OFFER:

1. As on the date of this DPS, except approval of BSE in accordance with Regulation 28 of SEBI (LODR) Regulations, 2015 in respect of Proposed Preferential Issue, there are no other statutory approvals required for this Offer. However, if any statutory approval that become applicable prior to completion of this Offer, this Offer would be subject to the receipt of such other statutory approvals that may become applicable at a later date.
2. Non-resident equity shareholders who wish to tender their equity shares in the Target Company in this Offer will be required to submit all the applicable Reserve Bank of India (hereinafter referred to as "RBI") approvals that they would have obtained for acquiring, the equity shares of the Target Company. In the event such RBI approvals are not submitted, the Acquirers reserves the sole right to reject the equity shares tendered in the Offer.
3. The Acquirers, in terms of regulation 23 of the SEBI (SAST) Regulations, will have a right not to proceed with the Offer in the event the statutory approvals indicated above are refused. In the event of withdrawal, a PA will be made within 2 working days of such withdrawal, in the same newspapers in which this DPS has appeared.
4. In case of delay in receipt of any statutory approval, the SEBI may, if satisfied that delayed receipt of the requisite approvals was not due to any willful default or neglect of the Acquirers or failure of the Acquirers to diligently pursue the application for the approval, grant extension of time for the purpose, subject to the Acquirers agreeing to pay interest to the shareholders as directed by the SEBI, in terms of regulation 18(11) of the SEBI (SAST) Regulations. Further, if delay occurs on account of willful default by the Acquirers in obtaining the requisite approvals, regulation 17(9) of the SEBI (SAST) Regulations will also become applicable and the amount lying in the Escrow Account shall become liable to forfeiture.
5. No approval is required from any bank or financial institutions for this Offer.

VII. TENTATIVE SCHEDULE OF THE ACTIVITIES PERTAINING TO THE OFFER:

Activity	Date	Day
Public Announcement	25.09.2026	Friday
Publication of Detailed Public Statement in newspapers	05.10.2026	Monday
Submission of Detailed Public Statement to BSE, Target Company & SEBI	05.10.2026	Monday
Last date of filing draft letter of offer with SEBI	12.10.2026	Monday
Last date for a Competing offer	27.10.2026	Tuesday
Receipt of comments from SEBI on draft letter of offer	03.11.2026	Tuesday
Identified date*	05.11.2026	Thursday
Date by which letter of offer be dispatched to the shareholders	13.11.2026	Friday
Last date for revising the Offer Price	18.11.2026	Wednesday
Comments from Committee of Independent Directors of Target Company	18.11.2026	Wednesday
Advertisement of Schedule of activities for open offer, status of statutory and other approvals in newspapers and sending to SEBI, Stock Exchange and Target Company	19.11.2026	Thursday
Date of Opening of the Offer	20.11.2026	Friday
Date of Closure of the Offer	04.12.2026	Friday
Post Offer Advertisement	11.12.2026	Friday
Payment of consideration for the acquired shares	18.12.2026	Friday
Final report from Merchant Banker	28.12.2026	Monday

*Identified Date is only for the purpose of determining the names of the shareholders as on such date to whom the Letter of Offer would be sent. All owners (registered or unregistered) of equity shares of the Target Company (except the Acquirers / Promoters of Target Company and Selling Company) are eligible to participate in the Offer any time before the closure of the Offer.

VIII. PROCEDURE FOR TENDERING THE SHARES IN CASE OF NON RECIEPT OF LETTER OF OFFER:

1. All owners of Equity Shares (except the Acquirers / Promoters of Target Company and Selling Company) whether holding Equity Shares in dematerialized form or physical form, registered or unregistered, are eligible to participate in the Offer any time before closure of the tendering period.
2. There shall be no discrimination in the acceptance of locked-in and non-locked-in shares in the Offer. The residual lock-in period shall continue in the hands of the Acquirers. The shares to be acquired under the Offer must be free from all liens, charges and encumbrances and will be acquired together with the rights attached thereto.
3. Persons who have acquired the Equity Shares of the Target Company but whose names do not appear in the register of members of the Target Company on the Identified Date or unregistered owners or those who have acquired the Equity Shares of the Target Company after the Identified Date or those who have not received the Letter of Offer, may also participate in this Offer.
4. The Open offer will be implemented by the Acquirer through the Stock Exchange Mechanism made available by the Stock Exchange in the form of a separate window ("Acquisition Window") as provided under the SEBI (SAST) Regulations and SEBI Circular CIR/CFD/POLICYCELL/1/2015 dated April 13, 2015 issued by SEBI and as amended by SEBI Circular CFD/DCR/2/CIR/P/2016/131 dated December 09, 2016 and as per further amendment vide SEBI Circular SEBI/HO/CFD/DCR-III/ CIR/P/2021/615 dated August 13, 2021 and SEBI's Master Circular dated February 16, 2023, bearing reference number SEBI/HO/CFD/PoD1/P/CIR/2023/31 ("Master Circular").
5. BSE Limited shall be the designated Stock Exchange for the purpose of tendering shares in the Open Offer.
6. The Acquirers have appointed Allwin Securities Limited, Stock Broker for the open offer through whom the purchases and settlement of the Offer Shares tendered under the Open Offer shall be made. The contact details of the buying broker are as mentioned below:

Allwin Securities Limited
B-205/206 Ramji House, 30 Jambulwadi,
Kalbadevi Road, Mumbai- 400002
Tel: +91-22-43446444
E-mail: allwinsec@gmail.com
Website: www.allwinsecurities.com
SEBI Registration No.: INZ000239635

7. All the shareholders who desire to tender their equity shares under the Open Offer will have to intimate their respective stock brokers ("Selling Brokers") within the normal trading hours of the Secondary Market, during the Tendering period.
8. A separate Acquisition Window will be provided by the stock exchange to facilitate placing of sell orders. All the shareholders who desire to tender their equity shares under the Open Offer will have to intimate their respective stock brokers ("Selling Brokers") within the normal trading hours of the Secondary Market, during the Tendering period. The Selling broker can enter orders for dematerialized as well as physical Equity shares.
9. The Letter of Offer along with a form of acceptance cum acknowledgement would also be available at the SEBI website www.sebi.gov.in, and shareholders can also apply by downloading such forms from the said website.
10. No indemnity is needed from unregistered shareholders.

IX. THE DETAILED PROCEDURE FOR TENDERING THE SHARES IN THE OFFER WILL BE AVAILABLE IN THE LETTER OF OFFER

X. OTHER INFORMATION:

1. The Acquirers and the Target Company have not been prohibited by SEBI from dealing in the securities under directions issued pursuant to Section 11B or under any other regulations made under the SEBI Act.
2. The Acquirers have appointed Navigant Corporate Advisors Limited as Manager to the Offer pursuant to regulation 12 of the SEBI (SAST) Regulations.
3. The Acquirer have appointed Beetal Financial & Computer Services Pvt. Ltd, as Registrar to the Offer having office at Beetal House, 3rd Floor, 99 Madangir, Behind LSC, New Delhi – 110062. Tel No.: +91-11-29961281, +91-11-26051061, +91-11-26051064; E-mail Id: beetal@beetalfinancial.com; beetalrta@gmail.com; Website: www.beetalfinancial.com; Contact Person: Punit Kumar Mittal, SEBI Registration No.: INR 000000262.
4. This Detailed Pubic Statement would also be available at SEBI's website www.sebi.gov.in
5. This Detailed Pubic Statement is being issued on behalf of the Acquirers by the Manager to the Offer i.e., M/s. Navigant Corporate Advisors Limited.
6. The Acquirers accepts the full responsibility for the information contained in PA and DPS and also for the obligations of the Acquirers as laid down in the SEBI (SAST) Regulations, 2011 and subsequent amendments made thereof.

ISSUED BY MANAGER TO THE OFFER FOR AND ON BEHALF OF THE ACQUIRERS

Navigant

NAVIGANT CORPORATE ADVISORS LIMITED
804, Meadows, Sahar Plaza Complex, J B Nagar, Andheri Kurla Road,
Andheri (East), Mumbai - 400059.
Tel No.: +91 22 4120 4837 / 4973 5078
Email id: navigant@navigantcorp.com
Website: www.navigantcorp.com
SEBI Registration No: INM000012243
Contact person: Mr. Sarthak Vijlani

Place: Mumbai
Date: October 01, 2026

मिडकॅप-स्मॉलकॅपची सलग चौथ्या आठवड्यात घसरण; बाजारावर दबाव कायम

मुंबई, दि. ०४ (प्रतिनिधी) : भारतीय शेअर बाजारातील व्यापक निर्देशांकांवरील दबाव सलग चौथ्या आठवड्यात कायम राहिला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांच्या विक्रीमुळे या दोन्ही निर्देशांकांनी सलग चौथ्या आठवड्यात घसरण नोंदवली. आठवडाभरात निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांक ३.५ टक्के, तर निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक ३.३ टक्क्यांनी घसरला. या कालावधीत प्रमुख निर्देशांकांच्या तुलनेत व्यापक बाजाराची कामगिरी अधिक खराब राहिली. मुंबई शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांच्या एकत्रित बाजारमूल्यात या विक्रीमुळे सुमारे १५ लाख कोटी रुपयांची घट झाली. आठवड्याच्या अखेरीस सेन्सेक्स १,९८६.०४ अंक अर्थात २.६८ टक्क्यांनी घसरून ७१,९०९.७० अंकांवर बंद झाला. निफ्टी ५० मध्ये ७१८.५५ अंक अर्थात ३.१० टक्क्यांची घट होऊन तो २२,४२१.९५ अंकांवर स्थिरावला. क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये ग्राहक टिकाऊ वस्तू क्षेत्राला सर्वाधिक फटका बसला. या निर्देशांकात सुमारे ६ टक्क्यांची घसरण झाली. वाहन क्षेत्र ५.८ टक्क्यांनी घसरले. धातू, दैनंदिन वापराच्या वस्तू आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या निर्देशांकात चार टक्क्यांहून अधिक घट झाली. स्थावर मालमत्ता, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा तसेच तेल व वायू क्षेत्रातही तीन टक्क्यांहून अधिक घसरण झाली. मात्र माहिती-तंत्रज्ञान निर्देशांकाने ०.५ टक्क्यांची वाढ नोंदवली. मिडकॅप निर्देशांकातील घसरणीत पीबी फिनटेक, पतंजली फूड्स,



व्होडाफोन आयडिया, कोरोमंडल इंटरनॅशनल, स्विगी, एलआयसी हाउसिंग फायनान्स, जुबिलंट फूडवर्क्स, एसबीआय कार्ड्स अँड पेमेंट सर्व्हिसेस, येस बँक, कल्याण ज्वेलर्स इंडिया, हाउसिंग अँड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि रॅडिको खेतान यांसारख्या समभागांचा वाटा राहिला. स्मॉलकॅप निर्देशांकात आयएफसीआय, आदित्य बिर्ला रिअल इस्टेट, फिजिक्सवाला, गुजरात मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स, अफ्ले ३आय, इनॉक्स विंड, वॉकहार्ट आणि वेलस्पन कॉर्प यांसारख्या समभागांमध्ये घसरण झाली. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी सलग सहाव्या आठवड्यात विक्री सुरू ठेवत या आठवड्यात ३४,९६६.०७ कोटी रुपयांचे समभाग विकले. त्याचवेळी देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ३३,४५५.३० कोटी रुपयांची खरेदी करून बाजाराला आधार देण्याचा प्रयत्न केला.

बाजाराच्या पुढील दिशेबाबत तज्ज्ञांचा सूर सावध आहे. कोटक सिक्युरिटीजचे तांत्रिक संशोधन उपाध्यक्ष अमोल आठवले यांच्या मते, निफ्टीमध्ये अल्पावधीत स्थिती कमकुवत असली तरी बाजार काहीसा जास्त विक्री झालेल्या स्थितीत असल्याने उसळीची शक्यता नाकारता येत नाही. २२,२००-२२,३०० हा महत्त्वाचा आधार असून २२,५००-२२,६०० हा तातडीचा अडथळा ठरू शकतो. २२,५००च्या वर निर्देशांक गेल्यास २२,७००-२२,८००पर्यंत सुधारणा होऊ शकते; तर २२,२००खाली घसरण झाल्यास २२,०००-२१,९५०पर्यंत दबाव वाढू शकतो. बँक निफ्टीसाठी ५४,००० हा महत्त्वाचा आधार असून तो तुटल्यास ५३,५००-५३,२००पर्यंत घसरणीचा धोका आहे. मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेसचे सिद्धार्थ खेमका यांनी जागतिक रोखे बाजारातील मोठी घसरण, कच्च्या तेलातील वाढ आणि परदेशी गुंतवणूकदारांची मोठी विक्री यामुळे भारतीय बाजारावर नजीकच्या काळात दबाव राहण्याची शक्यता व्यक्त केली.

रिलिगेअर ब्रोकिंगचे अजित मिश्रा यांनी निफ्टी २०० आठवड्यांच्या सरासरीच्या प्रमुख आधारपातळ्यांखाली गेल्याने स्थिती मंदीची असल्याचे म्हटले. २२,०००-२२,२०० हा पुढील महत्त्वाचा आधार, तर २२,५००-२२,६०० हा अडथळा ठरू शकतो. एलकेपी सिक्युरिटीजचे रुपक डे यांच्या मते, निफ्टी २०० आठवड्यांच्या चलत सरासरीखाली बंद होण्याची ही कोविडनंतरची पहिली वेळ असून, २२,२००खाली २२,०६०पर्यंत घसरण होऊ शकते. २२,६००च्या खाली निर्देशांक राहिल्यास 'वाढीत विक्री'ची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

आयपीओ बाजारात पुढील आठवड्यात शांतता ; एकच नवा इश्यू

मुंबई, दि. ०४ (प्रतिनिधी): गेल्या दोन महिन्यांतील आयपीओच्या धामधुमीनंतर प्राथमिक बाजारात पुढील आठवड्यात तुलनेने शांतता पाहायला मिळणार आहे. ५ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात केवळ एका कंपनीचा नवा आयपीओ खुला होणार असून, मुख्य बाजारपेठेत एकही नवीन आयपीओ येणार नाही. मात्र, शेअर बाजारातील नोंदणीचा कार्यक्रम गजबजलेला राहणार असून तब्बल २९ कंपन्यांचे समभाग बाजारात व्यवहारासाठी उपलब्ध होणार आहेत. यापैकी आठ कंपन्या मुख्य बाजारपेठेतील, तर २१ कंपन्या लघु आणि मध्यम उद्योग (एसएमई) विभागातील आहेत.

२०२६ हे वर्ष आतापर्यंत प्राथमिक बाजारासाठी अत्यंत सक्रिय ठरले आहे. सप्टेंबरअखेरपर्यंत २७५ कंपन्यांनी आयपीओच्या माध्यमातून एकूण १.२१ लाख कोटी रुपयांहून अधिक भांडवल उभारले आहे. यामध्ये मुख्य बाजारपेठेतील ९६ कंपन्यांचा समावेश असून, त्यांनी जवळपास १.१३ लाख कोटी रुपये उभारले. विशेष म्हणजे ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांतच ६५,१७५ कोटी रुपयांचे आयपीओ बाजारात आले. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या २२,५६३ कोटी रुपये, एसबीआय फंड्स मॅनेजमेंटच्या ९,७९५ कोटी, मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेसच्या ९,२७५ कोटी, इंडो-एमआयएमच्या ३,८१२ कोटी, क्लीन मॅक्स एन्व्हायरो एनर्जी सोल्युशन्सच्या ३,०८० कोटी आणि धूत ट्रान्समिशनच्या ३,०६७ कोटी रुपयांच्या इश्यूचा त्यात समावेश आहे.

पुढील आठवड्यात ५ ऑक्टोबरला कोलकाता येथील कृत्रिम दागिन्यांचे वितरक आर. के. फॅशन ॲक्सेसरीजचा एसएमई आयपीओ खुला होणार आहे. कंपनी ४२.६७ लाख समभागांच्या नव्या इश्यूद्वारे ३४.९९ कोटी रुपये उभारण्याच्या तयारीत आहे.

वाढत्या रोखे परताव्यामुळे अमेरिकन शेअर बाजारातील तेजीवर दबाव

मुंबई, दि. ०४ (प्रतिनिधी) : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) क्षेत्रातील कंपन्यांच्या जोरदार कामगिरीमुळे अमेरिकी शेअर बाजारातील तेजी कायम असली, तरी दीर्घ मुदतीच्या सरकारी रोख्यांवरील परतावा अनेक दशकांच्या उच्चांकाजवळ पोहोचल्याने या तेजीसमोर जोखीम वाढली आहे. वाढते व्याजदर, तंत्रज्ञान कंपन्यांचे महागडे मूल्यांकन आणि एआय पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च यामुळे बाजारातील तेजी किती काळ टिकेल, याबाबत गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. 'नॅस्डॅक १००' निर्देशांक यंदा २२ टक्क्यांनी वाढला असून तो शुक्रवारी नव्या विक्रमी पातळीवर पोहोचला. 'एस अँड पी ५००' निर्देशांकही ऑगस्टमधील सार्वकालिक उच्चांकापासून एक टक्क्यापेक्षा कमी अंतरावर आहे.

अमेरिकेच्या ३० वर्षांच्या सरकारी रोख्यांवरील परतावा मागील आठवड्यात ५.६९ टक्क्यांवर, तर १० वर्षांच्या रोख्यांवरील परतावा ५.३ टक्क्यांहून अधिक झाला. दोन्ही पातळी २००२ नंतर प्रथमच दिसून आल्या आहेत. त्यामुळे व्याजदराच्या संवेदनशील कंपन्यांवरील दबाव वाढला आहे. मात्र, एआय



क्षेत्रातील प्रचंड गुंतवणूक आणि आगामी तिमाहीतील मजबूत नफ्याच्या अपेक्षेमुळे तंत्रज्ञान समभागांमध्ये तेजी कायम आहे. मायक्रोसॉफ्ट, एनव्हिडिया आणि ॲपल या एआय क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांनी गेल्या तीन महिन्यांत 'एस अँड पी ५००' तसेच 'नॅस्डॅक १००'च्या वाढीत मोठा वाटा उचलला आहे.

बाजारातील तेजीचा मोठा आधार आगामी तिमाहीतील कंपन्यांच्या नफ्याच्या अपेक्षांना आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या तिसऱ्या तिमाहीतील प्रति समभाग नफ्यात ६५ टक्क्यांहून अधिक वाढ होण्याचा अंदाज आहे. ऊर्जा क्षेत्रानंतर ही दुसऱ्या क्रमांकाची वेगवान वाढ ठरण्याची शक्यता आहे. त्याचवेळी 'एस अँड पी ५००'मधील कंपन्यांच्या एकूण प्रति समभाग नफ्यात २४ टक्क्यांहून अधिक वाढ अपेक्षित आहे. अशी वाढ झाली तर निर्देशांकाच्या नफ्यात सलग तिसऱ्या तिमाहीत २० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ नोंदवली जाईल. गेल्या तीन वर्षांत एआय क्षेत्राने अमेरिकी शेअर बाजारातील तेजीला मोठी चालना दिली आहे. एआयसाठी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कंपन्यांकडून शेकडो अब्ज डॉलरची गुंतवणूक होत असून, त्याचा फायदा चिप उत्पादकांपासून माहिती-केंद्र उभारणाऱ्या कंपन्यांपर्यंत विविध क्षेत्रांना होत आहे.

मात्र, या तेजीच्या पार्श्वभूमीवर जोखीमही वाढत आहे. एआयवरील प्रचंड खर्चातून अपेक्षित परतावा किती आणि केव्हा मिळेल, याबाबत बाजारात प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यात इराणमधील युद्ध, वाढत्या तेलाच्या किमतींमुळे टिकून राहिलेली महागाई आणि यंदा अमेरिकी फेडरल रिझर्व्हकडून आणखी व्याजदरवाढ होण्याची शक्यता या घटकांची भर पडली आहे.

जाहीर नोटीस

याद्वारे माझे अशील म्हणजेच **१). श्री. रामलखन यादव आणि २). श्री. हरी एम. यादव** यांच्या वतीने **नोटीस** देण्यात येत आहे की, त्यांनी स्वर्गीय श्रीमती सरोज यशवंत ठाकूर यांचे कायदेशीर वारस आणि प्रतिनिधी असलेले श्री. यश प्रणय ठाकूर यांच्याकडून सदनिका/फ्लॅट क्र. के-१, ४६४ चौ. फूट बिल्ट-अप क्षेत्रफळ, तळमजला, 'सुमेर नगर' इमारत, सुमेर नगर क्र. २ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, गाव मागाठाणेच्या सीटीएस क्र. ६४ या जमिनीवर बांधलेली, तालुका बोरिवली, नोंदणी उपजिल्हा आणि जिल्हा मुंबई उपनगर, एस. व्ही. रोड, कोरा केंद्रासमोर, बोरिवली पश्चिम, मुंबई ४०० ०९२ (ज्याला यापुढे सदर जागा म्हटले आहे) खरेदी करण्यास सहमती दर्शवली आहे.

मूळतः दिनांक २०.०१.१९८९ रोजीच्या करारानुसार मे. सुमेर डेव्हलपमेंट्स कडून श्री. मोहम्मद साजिद मोहम्मद साबीत सलमानी यांनी सदर जागा खरेदी केली होती. त्यानंतर वर्ष २००४-०५ मध्ये सुमेर नगर क्र. २ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावाची सोसायटी स्थापन झाली. सोसायटीने श्री. मोहम्मद साजिद मोहम्मद साबीत सलमानी यांना सदस्य म्हणून प्रवेश दिला आहे आणि त्यांच्या नावे ५३६ ते ५४० पर्यंतचे विशिष्ट क्रमांक असलेले ५ शेअर्स समाविष्ट असलेले शेअर प्रमाणपत्र क्र. १०८ जारी केले आहे. दिनांक १७.०७.१९९४ रोजीच्या नोंदणीकृत विक्री करारानुसार श्री. मोहम्मद साजिद मोहम्मद साबीत सलमानी यांच्याकडून श्रीमती सरोज यशवंत ठाकूर यांनी सदर जागा खरेदी केली होती, सोसायटीने श्रीमती सरोज यशवंत ठाकूर यांना सदस्य म्हणून प्रवेश दिला आहे आणि त्यांच्या नावे शेअर प्रमाणपत्र हस्तांतरित केले आहे. दिनांक २९.११.२०२१ रोजीच्या विक्री करारानुसार श्रीमती सरोज यशवंत ठाकूर यांच्याकडून माझ्या अशिलांनी सदर जागा खरेदी केली होती. सोसायटीने त्यांना सदस्य म्हणून प्रवेश दिला आहे आणि त्यांच्या संयुक्त नावे शेअर प्रमाणपत्र हस्तांतरित केले आहे. तथापि, दिनांक २९.११.२०२१ रोजीच्या विक्री कराराच्या निष्पादनानंतर आणि उर्वरित मोबदला देण्यापूर्वी, श्रीमती सरोज यशवंत ठाकूर यांचे इच्छापत्राशिवाय निधन झाले. त्यांचा मुलगा प्रणय यशवंत ठाकूर यांचेही दिनांक २५.१२.२०२१ रोजी निधन झाले, त्यांच्या मागे त्यांचा नातू श्री. यश प्रणय ठाकूर हा त्यांचा एकमेव वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी उरला आहे. सदर श्री. यश प्रणय ठाकूर यांनी दिनांक २४.०४.२०२४ रोजी माननीय मुंबई उच्च न्यायालयाकडून त्यांच्या बाजूने 'लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' मिळवले आहे आणि आता श्री. यश प्रणय ठाकूर यांनी माझ्या अशिलांच्या नावे सदर जागेचे प्रभावी हस्तांतरण करण्यासाठी आवश्यक करार निष्पादित करण्यास सहमती दर्शवली आहे.

माझ्या अशिलांनी असेही कळवले आहे की, सदर फ्लॅट क्र. के-१ च्या संदर्भात मे. सुमेर डेव्हलपमेंट्स (ज्यांना त्यात विकासक म्हटले आहे) आणि श्री. मोहम्मद साजिद मोहम्मद साबीत सलमानी (ज्यांना त्यात खरेदीदार म्हटले आहे) यांच्यात निष्पादित झालेला दिनांक २०.०१.१९८९ रोजीचा मूळ करार तसेच मुद्रांक शुल्क भरल्याची पावती, लॉजिंग पावती आणि इंडेक्स-२ सदर श्री. यश प्रणय ठाकूर यांच्याकडे उपलब्ध नाहीत.


सदर जागेमध्ये आणि किंवा सदर जागेच्या संदर्भातील मूळ मालकी हक्क दस्तऐवजांमध्ये/कागदपत्रांमध्ये विक्री, गहाणवट, अभिहस्तांकन, प्रभार, ट्रस्ट, धारणाधिकार, ताबा, बक्षीसपत्र, वारसा हक्क, देखभाल, कुळवहिवाट, भाडेपट्टा, सुखसोयीचा हक्क किंवा इतर कोणत्याही मार्गाने कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्याच्या पुष्ट्यर्थ कागदोपत्री पुराव्यासह (आणि त्याशिवाय नाही) खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खालील स्वाक्षरीकर्त्यांना लेखी स्वरूपात कळवावे; अन्यथा माझे अशील असे गृहीत धरतील की सदर जागा सर्व बोजांपासून मुक्त आहे आणि त्यानंतर प्राप्त झालेला कोणताही दावा सोडून दिलेला मानला जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०५.१०.२०२६

सही/-
श्रीमती सावित्री नवीन पुजारी
उच्च न्यायालय वकील,
३०१, तिसरा मजला, स्टर्लिंग सीएचएस लिमिटेड,
लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, एकसर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९१

बायोकॉन इलेक्ट्रिकचा आयपीओसाठी सेबीकडे डीआरएचपी दाखल

बंगळुरू, दि. ०४ (वृत्तसंस्था) : विद्युत उत्पादनांच्या क्षेत्रातील बायोकॉन इलेक्ट्रिक लिमिटेडने प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री अर्थात आयपीओसाठी भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाकडे (सेबी) मसुदा लाल हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे. 'बायोकॉन' या ब्रँडअंतर्गत विविध प्रकारच्या विद्युत उत्पादनांची निर्मिती, विक्री आणि वितरण करणाऱ्या कंपनीने प्रस्तावित आयपीओच्या माध्यमातून एकूण ५९ लाख समभाग बाजारात आणण्याची तयारी केली आहे. कंपनीचे समभाग मुंबई शेअर बाजार



(बीएसई) आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या (एनएसई) मुख्य मंडळावर सूचिबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

प्रस्तावित आयपीओमध्ये ४८ लाख समभागांचा नवीन समभागविक्रीचा भाग, तर प्रवर्तक विक्री भागधारकांकडून ११ लाख समभागांची विक्री प्रस्तावित आहे. त्यामुळे आयपीओतील एकूण ५९ लाख समभागांपैकी बहुतांश समभाग नवीन जारी केले जाणार आहेत. प्रत्येक समभागाचे दर्शनी मूल्य १० रुपये निश्चित करण्यात आले आहे. कंपनीने अद्याप आयपीओची किंमतपट्टी आणि इश्यूची अंतिम तारीख जाहीर केलेली नाही.

नवीन समभागांच्या विक्रीतून मिळणाऱ्या निव्वळ निधीचा वापर कंपनीच्या कार्यभांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केला जाणार आहे. त्यासाठी ६२.५७ कोटी रुपये राखून ठेवण्याचा प्रस्ताव आहे. उर्वरित निधी सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरण्यात येणार आहे. आयपीओच्या माध्यमातून भांडवल उभारल्यानंतर कंपनीच्या व्यवसायविस्तारासाठी आणि दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक निधीची उपलब्धता वाढण्याची अपेक्षा आहे. आयपीओच्या व्यवस्थापनासाठी जीवायआर कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड यांची बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ही या इश्यूची नोंदणीदार कंपनी आहे. सेबीकडे डीआरएचपी दाखल झाल्यानंतर प्रस्तावित आयपीओच्या प्रक्रियेला पुढील टप्प्यात प्रवेश मिळाला असून, नियामकाची मंजुरी आणि त्यानंतरच्या प्रक्रियेनुसार कंपनीच्या समभागांच्या सूचिबद्धतेचा मार्ग मोकळा होणार आहे.

punjab national bank
Together for the better

एआरएमबी, मुंबई शहर

६ वा मजला, युनायटेड बँक ऑफ इंडिया टॉवर, सर पी. एम. रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१ ई-मेल: cs6041@pnb.bank.in

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री नोटीस

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (सरफेसी कायदा) अंतर्गत मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोंकडे गहाण/प्रभारित असलेली खाली वर्णन केलेली मालमत्ता, जिचा रचनात्मक/प्रतीकात्मक/प्रत्यक्ष ताबा बँक/सुरक्षित धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती संबंधित कर्जदार आणि जामीनदार यांच्याकडून बँक/सुरक्षित धनकोंना देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या तारखेला "जे जसे आहे जेथे आहे", "जे जसे आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर विकली जाईल. राखीव किंमत आणि इसारा रक्कम (ईएमडी) संबंधित मालमत्तांच्या समोर खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

सुरक्षित मालमत्तेची अनुसूची

कर्जदाराचे नाव, (फर्म / कंपनी)सह-कर्जदार / मालक / भागीदार / संचालक / जामीनदार / गहाणखतदार	गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील / मालकाचे नाव (मालमत्तेचे गहाणखतदार)	अ) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी नोटिशीची तारीख ब) १३(२) नुसार एकूण थकीत रक्कम + व्याज आणि आकार क) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत ताब्याची तारीख ड) ताब्याचे स्वरूप प्रतीकात्मक/प्रत्यक्ष/रचनात्मक	अ) राखीव किंमत ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख) क) बोली वाढीची रक्कम	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	सुरक्षित धनकोंना ज्ञात असलेल्या बोजांचा तपशील	प्रॉपर्टी आयडी क्यूआर कोड
एआरएमबी मुंबई शहर रिझवान मोईनुद्दीन सय्यद श्रीमती अनीसा रिझवान सय्यद	रहिवासी फ्लॅट क्र. ४०२, ४ था मजला, ए-विंग, ग्रीन पाम्स, प्लॉट क्र. १८ आणि १९, सेक्टर १५, घणसोली (पूर्व नवी मुंबई), पिन ४००७०५ (बिल्ट-अप क्षेत्रफळ ८९३ चौ. फूट)	अ) २४.०९.२०२५ ब) ३१.०८.२०२५ रोजी असलेली रु. १,२८,४५,०८६.७८/- अधिक पुढील व्याज आणि इतर आकार क) ०५.०१.२०२६ ड) प्रतीकात्मक	अ) रु. १,५३,००,०००/- ब) रु. १५,३०,०००/- (२७/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत) क) रु. २५,०००/-	२७/१०/२०२६ सकाळी ११.०० ते सायंकाळी ०४.००	माहित नाही	

ई-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती

१. ही विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मध्ये विहित केलेल्या अटी आणि शर्तींच्या आणि खालील पुढील अटींच्या अधीन असेलः
२. मालमत्ता "जे जसे आहे जेथे आहे", "जे जसे आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर विकल्या जात आहेत.
३. वर दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशील प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार दिला गेला आहे, परंतु या घोषणेतील कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळलेल्या माहितीसाठी प्राधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.
४. वर नमूद केल्यानुसार https://baanknet.com या वेबसाईटवर उपलब्ध करून दिलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खालील स्वाक्षरीकर्त्यांकडून ही विक्री केली जाईल.
५. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया www.baanknet.com, www.pnbindia.in पहा.
६. संपर्क व्यक्तीः श्री. सुशील कुमार-८४२०१९४६७४, श्री. पवन गुडाधे - मोबाईल ९४२३७४३११०, श्री. काशिफ जुबेर मोबाईल ८४२५९८१७३३.
७. वरीलपैकी कोणत्याही मालमत्तेसाठी बोली लावणाऱ्या बोलीदाराला निश्चित राखीव किंमतीपेक्षा किमान वाढीव रक्कम जोडून बोली लावावी लागेल.
टीप- याव्यतिरिक्त, केंद्र सरकार/राज्य सरकार/कोणत्याही वैधानिक संस्थेची कोणतीही वैधानिक देणी मालमत्तेच्या खरेदीदारास भरावी लागतील. बँक भूतकाळातील/वर्तमानातील/भविष्यातील कोणत्याही प्रकारची देणी सहन करणार नाही.

सरफेसी कायदा, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री नोटीस

दिनांक: ०५.१०.२०२६
ठिकाण: मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक